महावितरण
महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित
(A Govt. of Maharashtra Undertaking)
CIN : U40109MH2005SGC153645
दूरध्वनी क्र. ६९८५२२००
Email : ciro@mahadiscom.in
Website : www.mahadiscom.in
औद्योगिक संबंध विभाग, प्रकाशगड,
प्लॉट जी - ९, प्रकाशगड, ४ था मजला,
प्रा. अनंत काणेकर मार्ग, वांद्रे (पूर्व), मुंबई -५१.

जा. क्र. औसंवि/ब/ No 40837 दिनांक : 16 DEC 2025

# परिपत्रक

**विषय : MSEB HCL Group Mediclaim Insurance Policy सन २०२५-२६ बाबत.**

******

MSEB HCL Group Mediclaim Insurance Policy सन २०२५-२६ या कालावधीकरिता मुळ राशीभूत विमा रक्कम रु. ५ लाख व Compulsory Increased Sum Insured रु.५ लाख अशी एकूण रु.१० लाखांपर्यंत मेडीक्लेम योजना कार्यान्वित करण्याकरिता मा.व्यवस्थापकीय संचालक, म.रा.वि.मं.सुत्रधारी कंपनी मर्यादित तथा अपर मुख्य सचिव (ऊर्जा), महाराष्ट्र राज्य यांनी मा.अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक, महावितरण, महानिर्मिती व महापारेषण तसेच चारही कंपन्यांचे संचालक (वित्त) व संचालक (मासं), महावितरण, तसेच कार्यकारी संचालक (मासं), महावितरण, महानिर्मिती, महापारेषण व कार्यकारी संचालक (वित्त), महावितरण यांच्याशी विचारविनिमय करुन मंजूरी दिलेली आहे.

**MSEB HCL Group Mediclaim Insurance Policy: २०२५-२६ ची ठळक वैशिष्ट्ये :**
**(योजनेचा कालावधी दि. २९.११.२०२५ ते दि.२८.११.२०२६)**

१. MSEB HCL Group Mediclaim Insurance Policy चा क्रमांक **मूळ राशीभूत विमा रक्कम रु.५ लाख (५९००००/४८/२०२६/४५१५) व Compulsory Increased Sum Insured रु.५ लाख (५९००००/४८/२०२६/४५१६)** असून या योजनेचा कालावधी दि.२८.११.२०२५ च्या मध्यरात्रीपासून म्हणजेच दि.२९.११.२०२५ (००:०० तासापासून) ते दि.२८.११.२०२६ च्या मध्यरात्रीपर्यंत (२४:०० तासांपर्यंत) असा एक वर्षाचा आहे.

२. सदर योजना **म.रा.वि.मं. सुत्रधारी कंपनी मर्या. व महावितरण कंपनीमध्ये दि.०१ नोव्हेंबर २०२५ रोजी सेवेमध्ये कार्यरत असणाऱ्या सर्व कर्मचारी व त्यांच्यावर अवलंबित असणाऱ्या कुटुंबातील जास्तीत जास्त ०५ सदस्यांसाठी मुद्दा क्र.३.१ मधील कुटुंबाच्या व्याख्येनुसार लागू राहील.** तसेच, या कंपन्यांमधील सर्व संचालक, प्रतिनियुक्तीवर कार्यरत असलेले अधिकारी, कर्मचारी आणि महावितरण कंपनीमधील पदवी प्रशिक्षण अभियंता (GET), पदविका प्रशिक्षण अभियंता (DET), लेखा सहाय्यक, कनिष्ठ सहाय्यक (लेखा) / (मासं), उपकेंद्र सहाय्यक, विद्युत सहाय्यक व वीजसेवक अशा विहीत पध्दतीने नियुक्त झालेल्या सर्व अधिकारी / कर्मचारी आणि सर्व सहाय्यक कर्मचाऱ्यांकरिता लागू राहील.

३. सदर योजनेतंर्गत वैद्यकीय विमा संरक्षण हे कर्मचारी व त्याच्यावर अवलंबित असणाऱ्या कुटुंबातील खाली नमूद कुटुंबाच्या व्याख्येतील सदस्यांपैकी कर्मचाऱ्याने निर्देशीत केलेल्या कोणत्याही ०५ सदस्यांसाठी **मूळ राशीभूत विमा रक्कम रु. ०५ लाखांपर्यंत राहील.** तसेच **रु. ०५ लाखांपुढील रु. ०५ लाखांकरिताचा Compulsory Increased Sum Insured अशा प्रकारे एकूण विमा रक्कमेचे संरक्षण रु. १० लाखांपर्यंतचे राहील.**

३.१ **कुटुंबाची व्याख्या :-**

- कर्मचारी / अधिकारी यांची पत्नी किंवा पती.
- कर्मचारी / अधिकारी यांवर अवलंबित असणारी औरस मुले/ सावत्र मुले / कायदेशीर दत्तक घेतलेली मुले.
  (तथापि, विमा कंपनीच्या नियमानुसार अवलंबित मुलांच्या बाबतीत खालील अटी लागू राहतील.
  - १८ वर्षापेक्षा जास्त वय असलेला मुलगा / मुलगी नोकरी करत असल्यास अथवा मुलगी विवाहीत असल्यास त्यांना अवलंबित समजण्यात येणार नाही.
  - तथापि, २६ वर्षापर्यंत वय असलेल्या मुलाचे शिक्षण सुरु असेल व तो कर्मचाऱ्यावर पूर्णपणे अवलंबित असेल तर अशा मुलाला अवलंबित समजण्यात येईल.
  - मुलगी अविवाहीत असल्यास तिचा विवाह होईपर्यंत ती कर्मचाऱ्यांवर पूर्णपणे अवलंबित आहे असे समजण्यात येईल.
  - कर्मचाऱ्यांवर संपूर्णपणे अवलंबून असलेली मतीमंद अथवा अपंग मुले.
- कर्मचारी / अधिकारी यांच्यावर पूर्णपणे अवलंबून असलेले कर्मचारी / अधिकारी यांचे आई-वडील, **महिला कर्मचाऱ्यांच्या बाबतीत त्यांच्यावर पूर्णपणे अवलंबून आणि त्यांच्याबरोबर राहत असलेल्या त्यांच्या आई-वडील किंवा सासु-सासरे यांपैकी एका पर्यायाची निवड करता येईल.**
- कर्मचारी / अधिकारी यांच्यावर पूर्णपणे अवलंबून असलेल्या १८ वर्ष वयाखालील अविवाहीत भाऊ.
- कर्मचारी / अधिकारी यांच्यावर पूर्णपणे अवलंबून असलेल्या अविवाहीत बहिणी व घटस्फोटीत अथवा विधवा बहिणी, यांच्याबाबत त्यांचे वय लक्षात घेऊ नये.
- या नियमाखालील प्रतिपूर्ती करण्यासाठी, कर्मचारी / अधिकारी यांची अंशकालीन नोकरी व्यतिरिक्त अन्य नोकरीस असलेली मुले आणि अविवाहीत मुली लाभदायक नोकरीत असल्याचे समजण्यात येईल आणि ती त्यांच्यावर अवलंबून असल्याचे मानण्यात येणार नाही. कर्मचारी / अधिकारी यांच्यावर अवलंबून असलेल्या आईवडीलांचे दरमहा किमान उत्पन्न अथवा मुळ निवृत्ती वेतन रु.५०००/- पर्यंत आहे असे आईवडील तसेच घटस्फोंटीत / विधवा बहीण हे कर्मचाऱ्यांवर अवलंबून आहेत असे समजण्यात येईल.

४. MSEB HCL Group Mediclaim Insurance Policy **योजनेमध्ये खालील काही अटी व शर्तीचा समावेश करण्यात आलेला आहे.**

**(अ) अतिरिक्त लाभांच्या सुविधा :-**

- वैद्यकीय उपचारा दरम्यान रुग्णालयात कर्मचारी मयत झाल्यास अशा प्रकरणामध्ये वैद्यकीय उपचाराच्या खर्चाच्या (योजनेच्या अटी व शर्तीनुसार पात्र असलेल्या विमा दाव्यांची) सर्व रक्कमेची मंजूरी (एकूण विमा रक्कम रु.१० लाख मर्यादेपर्यंत) तातडीने रुग्णालयास TPA मार्फत कळविण्यात येवून डिस्चार्ज देण्याची कार्यवाही करण्यात येईल. **सदर तरतूद फक्त कर्मचाऱ्यांकरीता लागू राहील.**
- जन्मजात आंतर व बाह्य व्यंगामुळे जीवनास धोका निर्माण होत असलेल्या प्रकरणी करावयाच्या वैद्यकीय उपचाराच्या खर्चाची रक्कम रु.१० लाख मर्यादेपर्यंत या योजनेमधून अदा करण्यात येईल.

(ब) **MSEB HCL Gr. Mediclaim Insurance Policy च्या योजनेमध्ये खालील अटी व शर्तीचा समाविष्ट करण्यात आलेला आहे:**

(I) **तक्रार निवारण यंत्रणा :**

- मेडिक्लेम योजनेच्या वैद्यकीय दाव्या संदर्भातील विविध तक्रारींचे तातडीने निरसन करण्याच्या दृष्टीने सांघिक कार्यालय तसेच परिमंडळ कार्यालय यांच्या स्तरावर तक्रार निवारण यंत्रणा सुरु करण्यात येत असल्याने, कर्मचाऱ्यांनी विमा योजने संदर्भातील तक्रारींकरीता इतर ठिकाणी दाद मागण्यापूर्वी आपली तक्रार संबंधीत तक्रार निवारण यंत्रणेकडे सादर करावी.

  सदर तक्रारींबाबत कर्मचाऱ्यांचे समाधान न झाल्यास कर्मचाऱ्यांनी इतर ठिकाणी त्यांच्या तक्रारी सादर करण्यापूर्वी आपली तक्रार दि ओरिऐन्टल इन्शुरन्स कंपनी लि.,मुंबई यांना अग्रेषित करुन त्याची प्रत मेडि असिस्ट हेल्थकेअर प्रा.लि. पुणे व संबंधीत परिमंडळ, सांघिक कार्यालय यांना देवून त्याबाबत संमती घ्यावी. **संबंधीत विमा व TPA कंपनी यांनी त्यांना प्राप्त झालेल्या तक्रारीचे निरासन ३० दिवसांमध्ये करुन, कर्मचाऱ्याला त्याबाबत प्रतिउत्तर न दिल्यास कर्मचाऱ्यांना इतर ठिकाणी त्यांच्या तक्रारीसाठी दाद मागण्याकरीता संमती मिळाली असे समजण्यात येईल.**

- वर नमूद केल्यानुसार तक्रार निवारण यंत्रणेच्या दृष्टीने सांघिक कार्यालय व परिमंडळ कार्यालयाकरीता खालीलप्रमाणे समिती गठीत करण्यात येत आहे.

**सांघिक कार्यालयातील तक्रार निवारण यंत्रणेचे समिती सदस्य**

१. मुख्य औद्योगिक संबंध अधिकारी
२. सह मुख्य औद्योगिक संबंध अधिकारी
३. दि ओरिऐन्टल इन्शुरन्स कंपनी लि.मुंबई यांचे प्रतिनिधी
४. मेडि असिस्ट हेल्थकेअर प्रा.लि. (TPA) चे प्रतिनिधी
५. कर्मचारी प्रतिनिधी

**परिमंडळ कार्यालयातील तक्रार निवारण यंत्रणेचे समिती सदस्य**

१. संबंधीत परिमंडळाचे मुख्य अभियंता
२. उप मुख्य औद्योगिक संबंध अधिकारी
३. मेडि असिस्ट हेल्थकेअर प्रा.लि. (TPA) चे प्रतिनिधी (परिमंडळ कार्यालयासाठी नियुक्त करण्यात आलेला सदस्य)
४. कर्मचारी प्रतिनिधी

उपरोक्त समिती ०३ महिन्यांतून एकदा मेडिक्लेम योजनेच्या वैद्यकीय दाव्या संदर्भातील विविध तक्रारींचे तातडीने निरसन करण्याच्या दृष्टीने बैठक घेवून पुढील योग्य ती कार्यवाही करतील.

(II) **वैद्यकीय उपचारासाठी रुग्णालयात दाखल होताना मेडि असिस्ट (TPA) या कंपनीस आगाऊ सुचना देणेबाबत.**

- **कर्मचाऱ्यांने Non Cashless प्रकरणांमध्ये** त्याच्या किंवा कुटूंबातील सदस्याच्या वैद्यकीय उपचारासाठी **रुग्णालयात दाखल झाल्यानंतर ४८ ते ७२ तासांच्या आत मेडि असिस्ट (TPA) या कंपनीस त्याबाबतची आगाऊ सुचना देणे (ई-मेल - msebmediclaim@mediassist.in) बंधनकारक राहील.** कर्मचाऱ्यांनी अशा प्रकारची **आगाऊ सुचना न दिल्यास वैद्यकीय प्रतिपूर्तीच्या देय असलेल्या देयकांमधून १० टक्के दंडनीय रक्कम (Penalty) विमा कंपनीमार्फत कपात करण्यात येईल.**

- **प्रतिपूर्तीच्या प्रकरणांमध्ये (Non Cashless) रुग्णालयातून डिस्चार्ज झाल्याच्या तारखेपासून ३० दिवसांच्या आत संपूर्ण मूळ प्रस्ताव विमा कंपनीकडे सादर करणे अनिवार्य राहील. रुग्णालयातून डिस्चार्ज झाल्यापासून ३० दिवसांपर्यंत प्रस्ताव सादर न केल्यास अशा प्रकरणी संपूर्ण प्रस्ताव नामंजूर करण्याचे अधिकार विमा कंपनीस राहील.**

- **कर्मचाऱ्यांनी मेडिक्लेम योजनेकरीता आपल्या कुटूंबातील फक्त नवीन अवलंबित सदस्यांची माहिती (लग्न झालेल्या प्रकरणी, नवजात बालकाच्या प्रकरणी) वर नमूद ३.१ मधील कुटुंबाच्या व्याख्येनुसार व १+५ सदस्यांच्या मर्यादेपर्यंत महावितरण कंपनीच्या Employee Portal वर तातडीने दि. ३१.१२.२०२५ पर्यंत सादर (Submit) करणे अनिवार्य आहे. सदर यादी ओरिऐन्टल इन्शुरन्स कंपनीला मेडिक्लेम योजनेसाठी सादर करण्यात येईल. तद्नंतर, कर्मचाऱ्यांना अवलंबितांच्या नावांचा समावेश अथवा त्यामध्ये बदल कोणत्याही परिस्थितीत करता येणार नाही, याची कर्मचाऱ्यांनी दक्षता घ्यावी. यास अपवादात्मक म्हणून फक्त मेडिक्लेम योजनेच्या कालावधीत नव्याने रुजू झालेले कर्मचारी, नवविवाहीत कर्मचारी व नवजात शिशुंचा योजनेमध्ये समावेश करता येईल.**

***टिप :** ज्या कर्मचाऱ्यांनी उपरोक्त माहिती अद्यापपर्यंत Employee Portal ला भरुन Submit केलेली नाही, अशा कर्मचाऱ्यांनी उपरोक्त माहिती महावितरण कंपनीच्या Employee Portal अंतर्गत Mediclaim या शिर्षकाखाली Family members details for Mediclaim यामध्ये दि.३१.१२.२०२५ पर्यंत अद्यावयत करण्याची सुविधा उपलब्ध करुन देण्यात येत असून कर्मचाऱ्यानी सदर माहिती भरणे अनिवार्य आहे. सदर माहिती भरताना कर्मचाऱ्यांने दक्षता घेवून आपल्या कुटुंबातील अवलंबित संदस्यांची नांवे अचूक भरावीत. सदर माहिती तपासाअंती चुकीची किंवा दिशाभूल करणारी आढळल्यास सदर कर्मचाऱ्यावर कंपनीच्या नियमानुसार कडक शिस्तभंगाची कारवाई करण्यात येईल यांची नोंद घ्यावी. ज्या कर्मचाऱ्यांनी यापूर्वी आपल्या अवलंबितांची यादी १+५ यापूर्वीच सादर केलेली आहे त्यांना त्या संदर्भात माहिती भरण्याची आवश्यकता नाही.***

***तद्नंतर** नव्याने रुजू झालेले कर्मचारी, नवविवाहीत कर्मचारी व नवजात शिशु यांचा योजनेमध्ये समावेश करण्यासाठी ६० दिवसांच्या आत कागदपत्रांच्या पुराव्यासह संबंधीत परिमंडळातील उपमुख्य औद्योगिक संबंध अधिकारी यांच्यामार्फत Excel sheet द्वारे भरुन irdho123@gmail.com या ईमेलद्वारे कळविणे बंधनकारक राहील.*

५. सदर योजनेंतर्गत Cashless or Non - Cashless वैद्यकीय उपचार घेण्यासाठी रुग्णालयामध्ये दाखल झाल्यानंतर उपचारासाठी देण्यात येणाऱ्या कक्षांचे (Room Rent) दर खालीलप्रमाणे राहतील.

- **सामान्य कक्ष (General Room) : १% of Sum Insured 5 Lakh (Rs. 5000/-) or actual expenses whichever is less.**
- **अति दक्षता विभागातील कक्ष (ICU Room ) : 2% of Sum Insured 5 Lakh (Rs. 10000/-) or actual expenses whichever is less.**
- वरील कक्षांचे ( Room Rent) दर हे In case fo emergency (Emergency means Life Threating), Trauma, Accident (On Duty / Road ) अशा प्रकरणामध्ये शिथील करण्यात आलेले आहेत.
- वर नमूद केलेले कक्षांचे (Room Rent) दर हे मुळ राशीभूत विमा रक्कम रु.५ लाख पूर्णपणे संपुष्टात आल्यानंतर Compulsory Increased Sum Insured रु.५ लाखांकरीता व कर्मचाऱ्यांनी ऐच्छिकपणे घेतलेल्या Additional Valuntory Top Up करिता देखिल योजनेच्या अटी व शर्तीनुसार लागू राहतील.

६. या योजनेमध्ये आजारांवरील वैद्यकीय खर्चाची मर्यादा (Diseasewise Capping) काढण्यात आलेली आहे. परंतु, डोळयाच्या शस्त्रक्रियेसाठी (Cataract Operation including Laser Treatment) करिता प्रति डोळा रु.४५०००/-ची मर्यादा ठेवण्यात आलेली आहे.

७ (अ) या योजनेमध्ये कर्मचाऱ्यास किंवा त्यांच्या अवलंबितास पूर्वी असलेल्या आजारांचा समावेश करण्यात आलेला आहे. (Pre-existing Diseases Covered)

ब) या योजनेमध्ये पहिल्या ३० दिवसांपर्यंतचा कालावधी शिथिल करण्यात आला आहे. (First 30 days waiting period waived off)

(क) सदर योजना सुरु झाल्यापासून पहिल्या ०२ ते ०४ वर्षापर्यंतचा प्रतिक्षा कालावधी शिथिल करण्यात आलेला आहे. (First 02 to 04 years waiting period waived off )

८. या योजनेतंर्गत रुग्णालयामध्ये दाखल होण्यापूर्वी ३० दिवसांपूर्वीचा व रुग्णालयातून डिस्चार्ज दिल्यानंतरच्या ६० दिवसांपर्यंत केलेल्या उपचारासाठीच्या वैद्यकीय खर्चाची प्रतिपूर्ती देय आहे. (Pre hospitalisation upto 30 days and post hospitalisation upto 60 days Covered)

९. मेडिक्लेम योजनेमध्ये नवजात मुलाचा समावेश पहिल्या दिवसापासून (New Born Baby day one cover) करण्यात आलेला आहे.

१०. विविध आजारांकरीता व विशेषत: कॅन्सर आजाराच्या उपचारासाठी Modern / Advance / Robotic surgeries तसेच Targeted Therapy, Adjurant Chemotherapy and Advance Oral Chemotharapy (Tablets) यांचा समावेश करण्यात आलेला आहे.

११. या योजनेमध्ये आयुर्वेदीक उपचार जर शासकीय रुग्णालय अथवा शासकीय रुग्णालयाशी सलग्न शासकीय महाविद्यालयात घेतले असल्यास त्याची प्रतिपूर्ती देय राहील.

**टिप :** Day Care मधील सर्व वैद्यकीय उपचारांसाठी किमान MBBS डॉक्टरांच्या देखरेखीखाली उपचार घेणे बंधनकारक राहील अन्यथा वैद्यकीय उपचाराची प्रतिपूर्ती मिळणार नाही.

**१२. कार्यरत कर्मचाऱ्यांकरिता मेडीक्लेम योजना सन २०२५-२६ करिता मुळ राशीभूत विमा रक्कम रु.०५ लाख व त्यापुढील Compulsory Increased Sum Insured रु.०५ लाख अशी एकूण रु.१० लाखांची मेडिक्लेम योजना कार्यान्वित करण्यात आलेली आहे. Compulsory Increased Sum Insured तसेच Additional Voluntary Top Up याकरिता मेडिक्लेम योजनेच्या अटी व शर्ती ह्या मूळ योजनेप्रमाणेच राहतील.**

मुळ राशीभूत विमा रक्कम रु.०५ लाखांकरीता आणि Compulsory Increased Sum Insured रु.०५ लाखांकरीता कार्यरत अधिकारी / कर्मचारी तसेच सर्व प्रशिक्षणार्थी अभियंता व सहाय्यक प्रवर्ग यांच्या मासिक वेतनातून माहे डिसेंबर -२०२५ ते नोव्हेंबर -२०२६ या कालावधीमध्ये खालीलप्रमाणे रक्कम कपात करण्यात येईल.

**अ) मुळ राशीभूत विमा रक्कम रु.५ लाखांकरिता दरमहा रु.१००६/- (GST सह) व Compulsory Increased Sum Insured रु.५ लाखांकरिता दरमहा रु.२४६- (GST सह) अशी एकूण रु.१० लाखांकरिता विमा रक्कम दरमहा रु.१२५२/- (GST सह) राहील. सदर रक्कम कर्मचाऱ्यांच्या माहे डिसेंबर -२०२५ ते नोव्हेंबर-२०२६ च्या वेतनातून कपात करण्यात यावी.**

**ब) जर कर्मचारी माहे नोव्हेंबर-२०२५ मध्ये सेवानिवृत्त / मयत झाल्यास त्यांच्या शेवटच्या वेतनातून मागील वर्षीच्या योजनेची उर्वरित रक्कम रु.१०४६/- व सद्यस्थितीत चालू असलेल्या योजनेची वार्षिक विमा रक्कम रु.१५०२४/- अशी एकूण रु.१६०७०/- एकरकमी रक्कम कपात करण्यात करावी. तद्नंतरच सेवानिवृत्त / मयत कर्मचाऱ्यांना व त्याच्यावरील अवलंबित सदस्यांना या योजनेचा लाभ दि.२९.११.२०२६ पर्यत मिळेल.**

**क) माहे डिसेंबर -२०२५ ते नोव्हेंबर - २०२६ या कालावधीमध्ये सेवानिवृत्त किंवा मयत होणाऱ्या कर्मचाऱ्यांच्या शेवटच्या वेतनातून वर नमूद केल्यानुसार प्रतिमाह रु.१२५२/- प्रमाणे उर्वरित रक्कम एकरकमी कपात करण्यात यावी. तद्नंतरच सेवानिवृत्त कर्मचाऱ्यांना या योजनेचा लाभ दि.२९.११.२०२६ पर्यत मिळेल.**

**ड) उपरोक्तप्रमाणे मेडीक्लेम योजनेसाठी कर्मचाऱ्यांकडून वैयक्तिकपणे अदा करण्यात येणारी विमा हप्ता रक्कम आयकर कायद्याच्या कलम -८० (ड) नुसार सवलतीसाठी पात्र राहील.**

**१३.महावितरण कंपनीतील सर्व प्रशिक्षणार्थी अभियंता व सर्व सहाय्यक प्रवर्गाच्या कर्मचाऱ्यांना प्रोत्साहनपर रु.१२५२/- इतकी रक्कम 'आरोग्य विमा अनुदान' म्हणून माहे डिसेंबर - २०२५ ते नोव्हेंबर -२०२६ या कालावधीकरिता वेतनातून अदा करण्यात यावी.**

१४. संबंधीत कार्यालयाने वर नमूद केल्यानुसार वेतनातून कपात करण्यात आलेली व Additional Voluntary Top Up विमा हप्त्याची रक्कम महावितरण कंपनीच्या मुख्य महाव्यवस्थापक (सां.ले.)

यांच्या निर्देशानुसार **ERP-10902351** या खाते शिर्षकाखाली (Account Head) जमा करण्यात यावी.

**१५. म.रा.वि.मं. सुत्रधारी कं.मर्या व महावितरण कंपन्यांतील कर्मचाऱ्यांची सदर योजनेच्या कालावधीमध्ये सेवा समाप्ती (Termination) झाल्यास किंवा कर्मचाऱ्याचा राजीनामा स्विकारल्यास अशा कर्मचाऱ्यास व त्याच्या अवलंबितास या योजनेचा लाभ उर्वरित कालावधीसाठी घेता येणार नाही. मात्र, सदर योजनेसाठी महावितरण कंपनीने कर्मचाऱ्यांच्या वतीने विमा कंपनीकडे योजना सुरु होताना विमा हप्ता अदा केलेला असल्याने सदर कर्मचाऱ्यांच्या शेवटच्या देय रक्कमेतून रु. १२५२/- दरमहा प्रमाणे माहे नोव्हेंबर - २०२६ पर्यंतची उर्वरित रक्कम एकरकमी कपात करुन घेण्यात यावी.**

सबब, ज्या-ज्या सक्षम अधिकाऱ्यांमार्फत सेवा समाप्ती किंवा राजीनामा प्रकरणी आदेश निर्गमित करण्यात येतील अशा प्रकरणांची माहिती संबंधीत परिमंडळ कार्यालयांच्या मानव संसाधन विभाग प्रमुखाने (सांघिक कार्यालयाकरिता प्रकरण परत्वे मुख्य महाव्यवस्थापक (मासं) / (तांत्रिक आस्था) / (वित्त व लेखा) यांच्या विभागांमार्फत) दरमहा तातडीने मुख्य औद्योगिक संबंध अधिकारी यांना ईमेलद्वारे irdho123@gmail.com यावर पाठवावी. संबंधीत कर्मचाऱ्यांची माहिती निरंक असेल तरीही दरमहा न कळविल्यास व अशी प्रकरणे निदर्शनास आल्यास सदर बाबत जबाबदारी निश्चित करण्यात येवून यानुषंगाने, कंपनीवर येणाऱ्या आर्थिक भाराची वसूली संबंधीत प्रकरणी जबाबदार असणाऱ्या कर्मचाऱ्यांकडून करण्यात येईल याची नोंद घ्यावी.

१६. कर्मचारी व त्यांच्यावर अवलंबित असणाऱ्या कुटुंबातील ०५ सदस्यांना Medi Assist (TPA) कंपनीच्या नेटवर्क रुग्णालयामध्ये (महावितरण कंपनीच्या Employee Portal (http://empportal.mahadiscom.in/EmpPortal) अंतर्गत Mediclaim या शिर्षकाखाली List of Hospitals यामध्ये नेट वर्क रुग्णालयांची यादी पहावयास मिळेल) वैद्यकीय उपचारासाठी कॅशलेस सेवेचा लाभ मिळेल. तसेच विना नेटवर्क रुग्णालयामध्ये उपचार घेतल्यास सदर योजनेच्या अटी व शर्तीच्या अधीन राहून वैद्यकीय उपचाराची अनुज्ञेय प्रतिपूर्ती दि ओरिएंटल इन्शुरन्स कंपनी लि., मुंबई या विमा कंपनीकडून Medi Assist (TPA) कंपनीच्या मार्फत कर्मचाऱ्याच्या बँक खात्यात अदा केली जाईल.

<u>टिप</u> : **प्रतिपूर्तीच्या प्रकरणांमध्ये (Non Cashless) रुग्णालयातून डिस्चार्ज झाल्याच्या तारखेपासून ३० दिवसांच्या आत संपूर्ण मूळ प्रस्ताव विमा कंपनीकडे सादर करणे अनिवार्य राहील. रुग्णालयातून डिस्चार्ज झाल्यापासून ३० दिवसांपर्यंत प्रस्ताव सादर न केल्यास अशा प्रकरणी संपूर्ण प्रस्ताव नामंजूर करण्याचे अधिकार विमा कंपनीस राहील.**

**<u>१७. मेडिक्लेमचा लाभ घेण्यासाठी Medi Assist कंपनीच्या संकेतस्थळावर उपलब्ध असलेले विविध पर्याय :-</u>**

- View your policy details
- Track Claim in real-time
- Download your E-Cards
- Get help whenever you need it
- Search Network Hospital

**१८. Additional Voluntary Top Up -करिताचा विमा हप्ता वेतनातून कपात करण्याचे संमती पत्र देणेबाबत. :-**

ज्या कर्मचाऱ्यांना मुळ राशीभूत विमा रक्कम रु. ०५ लाख (Basic Sum Insured) + रु. ०५ लाख Compulsory Increased Sum Insured रक्कमेपेक्षा जास्त रक्कमेचा म्हणजेच, Rs. 05 Lakhs BSI + Rs. 05 Lakhs CISI असा एकूण रु.१० लाखांपुढील रक्कमेकरिता **Additional Voluntory Top Up** घ्यावयाचा असल्यास कर्मचाऱ्यांना **Additional Voluntary Top Up** विमा रक्कम रु.१ लाख ते रु.१० लाख यापैकी एका विकल्पाची निवड महावितरण कंपनीच्या **Employee Portal द्वारे दि. २२.१२.२०२५ पर्यंत करावयाची आहे.**

याकरिता कर्मचाऱ्यांनी महावितरण Employee Portal URL :-(http://empportal.mahadiscom.in/EmpPortal) अंतर्गत Mediclaim या शिर्षकाखाली Application for Top - Up या पर्यायानुसार रु.१ लाख ते रु.१० लाख यापैकी एका विकल्पाची **निवड केल्यानंतर Submit करुन Confirm करावयाचे आहे.** कर्मचाऱ्यांनी ज्या **Additional Voluntary Top Up** विकल्पाची निवड केली असेल त्याकरिता येणारी **वार्षिक विमा हप्त्याची रक्कम GST सह एक रकमीय कर्मचाऱ्यांच्या माहे डिसेंबर २०२५ च्या वेतनातून कपात करण्यात येईल,** याबाबतची नोंद कर्मचाऱ्यांनी घ्यावी.

टिप : *एकदा Option Submit केल्यानंतर कोणत्याही स्थितीत सदर रक्कम परत करण्यात येणार नाही.*

तसेच, जर कर्मचाऱ्याच्या वेतनातून खालील दर्शविलेल्या **Additional Voluntary Top Up** ची विमा रक्कम एकरकमी कपात होत नसल्यास, अशा कर्मचाऱ्यांनी Money Receipt मार्फत ERP-10902351 या शिर्षकाखाली दि.३१.१२.२०२५ पूर्वी भरणा केलेली Money Receipt औद्योगिक संबंध विभागाच्या ई-मेलवर **irdho123@gmail.com** पाठवावी. दि.३१.१२.२०२५ नंतर भरणा केलेल्या Money Receipt बाबत कोणताही विचार केला जाणार नाही व त्याची सर्वस्वी जबाबदारी कर्मचाऱ्याची असेल.

**Additional Voluntary Top Up विकल्प रु. १ लाख ते रु. १० लाख करिता ऐच्छिक वार्षिक विमा हप्ता.**

| रु. ०५ लाख BSI + रु. ०५ लाख Compulsory Increased Sum Insured विमा रक्कमेपुढील | संपूर्ण वर्षाकरिता विमा हप्ता (GST सह) रुपयांमध्ये | | रु. ०५ लाख BSI + रु. ०५ लाख Compulsory Increased Sum Insured विमा रक्कमेपुढील | संपूर्ण वर्षाकरिता विमा हप्ता (GST सह) रुपयांमध्ये |
|---|---|---|---|---|
| १ लाख | ११३५६ | | ६ लाख | ४८०३१ |
| २ लाख | २०९७७ | | ७ लाख | ५०२१४ |
| ३ लाख | २४८४३ | | ८ लाख | ५२१९६ |
| ४ लाख | ३०७५७ | | ९ लाख | ५५५७१ |
| ५ लाख | ३८०४८ | | १० लाख | ६५७९६ |

मेडीक्लेम योजना दि.२९.११.२०२५ पासून सुरु झालेली असून वर नमूद केल्यानुसार **माहे डिसेंबर-२०२५ च्या वेतनातून कपात केलेली Additional Voluntary Top Up करिता वर्षभराची रक्कम ही विमा कंपनीस माहे जानेवारी-२०२६ मध्ये अदा करण्यात येवून त्याचा लाभ विमा कंपनीस रक्कम अदा केल्याच्या तारखेपासून म्हणजेच माहे जानेवारी-२०२६ पासून पुढे वर्षभराच्या कालावधीसाठी देय राहणार आहे** याची कर्मचाऱ्यांनी विशेष नोंद घ्यावी.

## १९. सामान्य आदेश क्र. २० (क) च्या तरतूदी - (फक्त कर्मचाऱ्यांबाबत)

**१९.१ वैद्यकीय सुविधा -** कार्यरत कर्मचाऱ्यांना वैद्यकीय खर्चाच्या प्रतिपूर्तीकरिता सर्वसाधारण आदेश क्र. २०(क), दि.१७/०७/१९६३ मधील तरतुदीनुसार देण्यात येणारा लाभ पूर्वीप्रमाणेच चालू राहील, त्यात कुठलाही बदल करण्यात आलेला नाही. मात्र कर्मचाऱ्यांस रु. १० लाखांपर्यंत (Rs. 05 Lakhs BSI + Rs. 05 Lakhs CISI ) वैद्यकीय खर्चाच्या प्रतिपूर्तीचा लाभ सुरुवातीस MSEB HCL Group Mediclaim Insurance Policy द्वारेच घ्यावा लागेल. कर्मचाऱ्यांकरीता स्वत:साठी रु. १० लाखांपेक्षा जास्त झालेल्या प्रत्यक्ष वैद्यकीय खर्चाच्या प्रतिपूर्तीसाठी सामान्य आदेश क्र.२० (क) प्रमाणे लाभ देय राहील. **सदर प्रतिपूर्तीच्या लाभाची रक्कम रु.१० लाखांपेक्षा जास्त असेल तरच सदर लाभ सा.आ.क्र.२० (क) अंतर्गत देय राहील याची कर्मचाऱ्यांनी नोंद घ्यावी.**

**१९.२ वैद्यकीय अग्रीम -**

**अ)** **कर्मचाऱ्यांना कामावर असताना अपघात झाल्यास** अथवा तातडीच्या प्रसंगी ज्या रुग्णालयात उपचारासाठी दाखल करण्यात आले ते रुग्णालय कॅशलेस मेडीक्लेमसाठी Medi Assist कंपनीच्या मान्यताप्राप्त रुग्णालयामध्ये नसेल तर परिमंडल कार्यालयांकरिता उप मुख्य औद्योगिक संबंध अधिकारी यांनी व अन्य कार्यालयांच्या बाबतीत संबंधीत विभागातील मानव

संसाधन विभाग प्रमुखांने कर्मचाऱ्याच्या सदर प्रकरणाची माहिती Medi Assist (TPA) कंपनीस दूरध्वनीद्वारे **(MSEB Mediclaim Help Line No. ०१२०-६९३७३४०)** देवून २४ तासांच्या आत प्राथमिक दावा / सुचनांच्या अनुषंगाने कर्मचाऱ्यांचे नाव, भ.नि.नि. क्रमांक, रुग्णालयाचे नावं व पत्ता इ. माहितीचा ईमेल देखील msebmediclaim@mediassist.in यावर पाठवावा.

**ब)** त्यानंतर, स.स्था.आ.क्र.३७७, दि. ३०.८.१९५८ चे सुधारपत्र क्र. १२, दि. १२.०२.१९९८व सा.आ. क्र २०(क)दि.१७.६.१९६३ तसेच प्रशासकीय परिपत्रक क्र.६११ दि. १४.१०.२०२० मधील तरतूदीच्या अधीन राहून संबंधीत सक्षम अधिकारी यांनी प्रकरण परत्वे कर्मचाऱ्यास वैद्यकीय उपचारासाठी अग्रीम रक्कम मंजूर करावी.

**क)** कर्मचाऱ्यास वरील प्रकरणी वैद्यकीय अग्रीम महावितरण कंपनीकडून मंजूर करण्यात आला असल्याची सुचना Medi Assist (TPA) कंपनीस ईमेलद्वारे msebmediclaim@mediassist.in द्यावी.

**ड)** अप्राणांतिक अपघाताच्या अथवा इतर तातडीच्या आजारांच्या घटनेमध्ये प्रकरणपरत्वे रुग्णालयास कर्मचाऱ्याच्या वैद्यकीय उपचारासाठी कंपनीकडून अग्रीम रक्कम दिलेली असल्यास कर्मचाऱ्यांने रुग्णालयातून डिस्चार्ज दिल्यानंतर तातडीने वैद्यकीय प्रतिपूर्ती प्रस्ताव संबंधीत कार्यालयाकडे सादर करावा. संबंधीत कार्यालयाने सदर प्रस्तावासोबत वैद्यकीय अग्रीम म्हणून रुग्णालयास अदा केलेल्या रक्कमेच्या पावतीची छायांकित प्रत व संबंधीत कार्यालयाचा बँक खाते क्रमांकासह **IFSC Code** ची माहिती कार्यालयाच्या Cancelled Cheque सह देवून सदर प्रकरणी मंजूर होणारी रक्कम कार्यालयाच्या बँक खात्यावर जमा करण्यासाठीचे स्वतंत्र पत्र जोडून प्रस्ताव कार्यालय प्रमुखामार्फत Medi Assist (TPA) कंपनीकडे पाठवावा. Medi Assist कंपनीकडून या प्रकरणी मंजूर रक्कम संबंधीत कार्यालयाच्या बँक खात्यावर जमा होईल, त्यानंतरच संबंधीत कार्यालयाने अग्रीम / वैद्यकीय प्रतिपूर्ती रक्कमेचा लेखा पूर्ण करावा. सदर रक्कमेच्या वैद्यकीय प्रतिपूर्तीबाबत संबंधीत कार्यालयाच्या मानव संसाधन विभाग प्रमुखाने Medi Assist कडे पाठपुरावा करावा या प्रकरणी संबंधीत परिमंडळांतील उपमुख्य औद्योगिक संबंध अधिकारी यांचे सहकार्य घ्यावे.

**इ)** प्राणांतिक अपघाताच्या घटनेमध्ये अथवा वैद्यकीय उपचाराप्रसंगी दुर्देवाने मृत्यु झाल्यास अग्रीम रक्कम मंजूर करुन रुग्णालयास सदर रक्कमेचा धनादेश अदा केला असल्यास अशा प्रकरणी वैद्यकीय अग्रीम / वैद्यकीय प्रतिपूर्ती रक्कमेचा लेखा पूर्ण होईपर्यंत कर्मचाऱ्यांच्या अवलंबितास तितक्या रक्कमेची देयके अदा करण्यात येवू नये.

**१९.३ वैद्यकीय प्रतिपूर्ती** -:

- कर्मचारी / कुटुंबीयाने Medi Assist (TPA) कंपनीच्या मान्यताप्राप्त रुग्णालयामध्ये उपचार घेतले नसतील व सदर रुग्णालय कॅशलेस मेडीक्लेमसाठी नसेल तर कर्मचारी / कुटुंबातील सदस्यांने Medi Assist (TPA) कंपनीकडे **MSEB Mediclaim Help Line No. 0120-6937340** यावर दुरध्वनीद्वारे अथवा ईमेलद्वारे २४ तासांच्या आत प्राथमिक दाव्याबाबत १९.२ च्या 'अ' मध्ये नमूद केल्यानुसार सुचना द्यावी. रुग्णालयातून डिस्चार्ज मिळाल्यानंतर तातडीने झालेल्या वैद्यकीय खर्चाच्या प्रतिपूर्तीचा प्रस्ताव Medi Assist (TPA) कंपनीकडे प्रतिपूर्ती दावा कार्यपध्दतीमध्ये व Medi Assist (TPA) कंपनीच्या संकेतस्थळावर नमूद केल्यानुसार योग्य ती सर्व कागदपत्रे जोडून संबंधीत कार्यालय व समन्वय अधिकारी (Nodal Officer) यांचेमार्फत पाठविणे बंधनकारक आहे.
- सदर प्रस्ताव प्राप्त झाल्यानंतर Medi Assist (TPA) कंपनीकडून या योजनेच्या अटी व शर्तीच्या अनुषंगाने रु. १० लाख मर्यादेपर्यंत वैद्यकीय प्रतिपूर्ती रक्कम मंजूर केली जाईल. सदर रक्कम कर्मचाऱ्याने अथवा अवलंबितांने प्रस्तावासोबत दिलेल्या Cancelled Cheque सह

**IFSC Code** नुसार बँकेच्या खात्यावर Medi Assist (TPA) कंपनीकडून परस्पर वर्ग करण्यात येईल.

- कार्यरत कर्मचाऱ्यास कामावर असताना अपघात झाल्याप्रकरणी अथवा तातडीच्या प्रसंगी कर्मचाऱ्यास वैद्यकीय अग्रीम अदा केला असल्यास १९.२ च्या 'ड' व 'इ' मध्ये नमूद केल्यानुसार कार्यवाही करावी.
- उपरोक्त प्रकरणी वैद्यकीय उपचारासाठी **फक्त कर्मचाऱ्यांसंदर्भात** प्रत्यक्षात झालेल्या एकूण खर्चाची रक्कम ही रु. १० लाख (Rs. ०५ Lakhs BSI + Rs. ०५ Lakhs CISI) यापेक्षा जास्त असल्यास सदर प्रकरणी स. स्था. आ. क्र. ३७७, दि. ३०.८.१९५८ चे सुधारपत्र क्र. १२, दि.१२.०२.१९९८ व सा.आ. क्र २० (क) दि.१७.६.१९६३ तसेच प्रशासकीय परिपत्रक क्र.६१० दि.१४.१०.२०२० मधील तरतूदीच्या अधीन राहून संबंधीत सक्षम अधिकाऱ्यांनी वैद्यकीय प्रतिपूर्ती मंजूर करुन वैद्यकीय प्रतिपूर्ती रक्कमेचा लेखा पूर्ण करावा.

**१९.४ महावितरण कंपनी मान्यताप्राप्त रुग्णालय -:** मेडीक्लेम योजनेकरिता नियुक्त केलेल्या TPA च्या सुचीवरील सर्व मान्यताप्राप्त रुग्णालयांचा समावेश सामान्य आदेश क्र. २० (क) सुचीमध्ये समाविष्ट करण्याबाबत सांघिक कार्यालयाचे परिपत्रक क्र. मासं/रवका/नि.क्र.१२/११४५७ दि.२१.०४.२०२३ मध्ये नमूद केलेले आहे. त्यानुसार यावर्षीच्या MSEB HCL Group Mediclaim Insurance Policy २०२५-२६ करिता Medi Assist Health Care Services या कंपनीची TPA म्हणून नियुक्ती करण्यात आलेली आहे. त्यामुळे Medi Assist (TPA) च्या यादीमधील Cashless करिता असलेली सर्व रुग्णालये ही महावितरण कंपनीची मान्यताप्राप्त रुग्णालये म्हणून उपरोक्त योजनेच्या कालावधीसाठी राहतील.

**१९.५** .कर्मचाऱ्याच्या वैद्यकीय उपचारापोटी या योजनेतंर्गत उपलब्ध असलेली विमा रक्कम रु.१० लाख (Rs. **05** Lakhs BSI + Rs. **05** Lakhs CISI) कंपनीच्या कार्यरत कर्मचाऱ्यासाठी खर्च झालेली असल्यास व तद्नंतर कर्मचाऱ्यांवर अवलंबित असणाऱ्या ०५ सदस्यीय कुटुंबियांपैकी कुठल्याही व्यक्तीस उपचाराची आवश्यकता असल्यास अशा प्रकरणी कर्मचाऱ्याच्या कुटुंबियांकरिता मुळ राशीभूत विमा रक्कम रु.०५ लाखापर्यंतच्या वैद्यकीय विम्याचा लाभ एक विशेष बाब म्हणून उपलब्ध करुन देण्यात आलेला आहे.

याकरिता, संबंधीत कार्यालयाने परिमंडळांच्या मुख्य अभियंता यांच्यामार्फत त्याबाबतचा प्रस्ताव मुख्य औद्योगिक संबंध अधिकारी, सांघिक कार्यालय, मुंबई यांचेकडे पाठवावा. सदर प्रस्तावास मा.संचालक (वित्त) हे संचालक (मासं) व मुख्य औद्योगिक संबंध अधिकारी यांचेशी विचारविनिमय करुन मंजूरी देण्यासाठीचे सक्षम अधिकारी राहतील.

**२०.**कर्मचारी व कुटुंबियांच्या सुविधेकरिता दि ओरिएंटल इन्शुरन्स कंपनी व **Medi Assist (T.P.A.)** यांचे मार्फत सर्व परिमंडल कार्यालयात Medi Assist (TPA) कंपनीचा प्रतिनिधी समन्वय अधिकारी (Nodal Officer) म्हणून नियुक्त करण्यात आलेले आहेत. कर्मचाऱ्यांनी MSEB HCL Group Mediclaim Insurance Policy संदर्भातील अडचणी सोडविण्याकरिता या समन्वय अधिकाऱ्यांची मदत घ्यावी.

कर्मचाऱ्यांना **MSEB HCL Group Mediclaim Insurance Policy** संदर्भात स्पष्टीकरण, माहिती किंवा रुग्णालयात दाखल होण्यासाठी अथवा वैद्यकीय प्रतिपूर्तीचा दावा दाखल करण्यासाठी करावयाच्या प्रक्रियेकरिता मदतीची अथवा चौकशीची गरज असल्यास कर्मचारी अथवा त्याचे कुटुंबिय **Medi Assist (T.P.A.)** कंपनीच्या **बहुभाषीक ग्राहक सेवा केंद्राशी खाली नमूद केल्यानुसार संपर्क / संवाद करु शकतात.**

- ➢ **सर्व साधारण चौकशी व कॅशलेस सुविधेच्या सवलतीसाठी हेल्पलाईन क्र. 0120-6937340**
- ➢ **रुग्णालयात दाखल झाल्याची सूचना देण्यासाठी ईमेल** - msebmediclaim@mediassist.in

Medi Assist कंपनीसोबत पत्रव्यवहार व वैद्यकीय प्रतिपूर्तीचे दावे दाखल करण्यासाठीचा पत्ता

**Medi Assist Health Care TPA Pvt.Ltd**
**माणिकचंद आयकॉन सी विंग, पहिला मजला,**
**ढोले पाटील रोड, पुणे- ४११००१.**

सदर परिपत्रक महावितरण कंपनीच्या **Employee Portal** अंतर्गत **Mediclaim व Circular - Industrial Relations Department** येथे उपलब्ध असून त्याची मुद्रांकित प्रत प्रसारीत करण्यात येणार नाही.

**(संजय रा. ढोके)**
**मुख्य औद्योगिक संबंध अधिकारी**

**प्रत माहितीसाठी सविनय सादर :**

१. संचालक (वित्त) / (संचलन) / (प्रकल्प) / (वाणिज्य) / (मासं), महावितरण, सां.का., मुंबई.
२. सह व्यवस्थापकीय संचालक, प्रादेशिक कार्यालय, औरंगाबाद / नागपूर
३. प्रादेशिक संचालक, प्रादेशिक कार्यालय, पुणे / कल्याण.
४. कार्यकारी संचालक (मासं) / (वित्त), महावितरण, सां.का., मुंबई.

**प्रत सस्नेह :** सर्व विभाग प्रमुख, विशेष कार्य अधिकारी.